**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करावं, असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतिनिमित्त मान्यवरांची आदरांजली, राज्यासह देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- 'केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं' देशभरातल्या १ हजार ४६६ पोलिसांना जाहीर, राज्यातल्या ९ जणांचा पदक विजेत्यांमध्ये समावेश

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रसिद्ध ओडिया कवी हरप्रसाद दास यांना जाहीर

**आणि**

- ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय फलंदाजांची हाराकिरी / ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून विजय

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त गुजरातमधल्या एकता नगर इथं आयोजित राष्ट्रीय एकता दिवस समारंभात ते बोलत होते. देश कमकुवत करणाऱ्या सर्व विचार किंवा कृती प्रत्येक नागरिकानं नाकारायला हवी, ही काळाची गरज असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली. स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या दृष्टिकोनाला मूर्त रूप देत ५५०हून अधिक संस्थानं एकत्र करून अशक्य वाटणारं काम साध्य केलं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. देशभरात सुरू असलेल्या एकता दौडमध्ये कोट्यवधी भारतीयांचा उत्साह पाहून प्रधानमंत्री म्हणाले…

***होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री***

प्रधानमंत्री मोदी यांनी दिवसाची सुरुवात स्टॅच्यू ऑफ युनिटीला पुष्पांजली अर्पण करून केली. यावेळी त्यांनी एकता दिनाची शपथ घेतली, तसंच भव्य एकता दिन संचलनाचं निरीक्षण केलं. या संचलनामध्ये बीएसएफ, सीआरपीएफ आणि विविध राज्य पोलीस दलांच्या तुकड्या सहभागी झाल्या होत्या. या संचलनात 'विविधतून एकता' या संकल्पनेवर दहा चित्ररथही सहभागी झाले होते. त्यात महाराष्ट्राच्या चित्ररथाचाही समावेश होता.

<><><><><>

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. सरदार पटेल यांनी आपल्या अढळ संकल्प, अदम्य धैर्य आणि कुशल नेतृत्वानं राष्ट्राला एकत्र आणण्याचं ऐतिहासिक कार्य केलं, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पटेल यांना आदरांजली वाहिली. पटेल यांचा दृढनिश्चय आणि दूरदृष्टीनं भारताला लोकशाही प्रजासत्ताकात एकत्र आणलं आहे. संस्थानांचं विलिनीकरण आणि एकतेसाठी पटेल यांचं अमूल्य योगदान प्रेरणादायी आहे, अशा शब्दात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

सरदार वल्लभभाई पटेल हे देशाच्या एकात्मतेमागची प्रेरक शक्ती होते. देशाची अखंडता, सुशासन आणि सार्वजनिक सेवेसाठी पटेल यांची अढळ वचनबद्धता पुढच्या प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आदरांजली वाहिली आहे. तसंच राष्ट्रीय एकता दिनाच्या त्यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही सरदार पटेल यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><><>

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राज्यात सर्वत्र एकता दौड, पदयात्रांसह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मंत्रालयात मुख्य सचिव राजेश कुमार यांनी पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार करून अभिवादन केलं. तसंच दिवंगत माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेलाही पुष्पहार अर्पण करून

अभिवादन केलं. नवी मुंबईत बेलापूर, रबाळे आणि नवी मुंबई महापालिका मुख्यालय इथं एकता दौडसह विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

**बुलढाणा जिल्ह्यात** मलकापूर इथल्या एकता दौडला केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या नेतृत्वात सुरुवात झाली. **परभणी शहरात** आज भाजपानं एकता दौड आयोजित केली होती. जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डिकर यांनी एकता दौडचा प्रारंभ केला. **वाशीम, यवतमाळमध्ये** क्रीडा मंत्रालय, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी यांनी एकत्रितपणे युनिटी मार्चचं आयोजन केलं होतं.

**छत्रपती संभाजीनगर** इथं एकता पदयात्रा आयोजित केली होती. तिचा समारोप इतर मागासवर्ग मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत झाला. **कोल्हापूर** जिल्ह्यात एकता पदयात्रेत दांडपट्टा, काठीचे खेळ यांसह विविध खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. नांदेड, **सोलापूर, धुळे, जळगाव सांगली, सातारा, रत्नागिरी, बीड,** तसंच **अहिल्यानगर**मधेही पोलीस आणि नागरिक एकता दौडमध्ये उत्स्फूर्त सहभागी झाले होते.

**<><><><><>**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिली जाणारी ‘केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं’ देशभरातल्या १ हजार ४६६ जणांना जाहीर झाली आहेत. कारवाई, तपास, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायपूरक विज्ञान या चार क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या विविध पोलीस यंत्रणांच्या कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो.

यंदा हा पुरस्कार मिळवणाऱ्यांमध्ये राज्यातल्या नऊ जणांचा समावेश आहे. तपास या विभागात पोलीस उपनिरीक्षक भगवान नारोडे, पल्लवी चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंगळे, किशोर काळे, शर्मिष्ठा वालावलकर, सहायक पोलीस निरीक्षक रूपाली पोळ, श्रवण दाठ आणि विवेक पाटील यांना, तर न्यायपूरक विज्ञान विभागात अ श्रेणीचे उपसंचालक संदीप चेट्टी यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झालं आहे.

**<><><><><>**

भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची आज पुण्यतिथी आहे. यानिमित्त देशभरातून त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आज इंदिरा गांधींच्या ‘शक्तिस्थळ’ या समाधीस्थळी जाऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली.

<><><><><>

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रसिद्ध ओडिया कवी हरप्रसाद दास यांना जाहीर झाला आहे. रोख एक लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असा या पुरस्काराचं स्वरूप असून त्याचं वितरण लवकरच होणार आहे. सन २०१० पासून सुरू झालेला हा पुरस्कार विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे एका अमराठी कवीला दिला जातो.

<><><><><>

मेलबर्न इथं झालेल्या दुसऱ्या टी-२० क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर ४ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केलं. मात्र  भारताच्या फलंदाजांनी अक्षरशः हाराकिरी केली. अभिषेक शर्मानं ६८ धावा केल्या. त्याखालोखाल हर्षित राणानं ३५ धावांचं योगदान दिलं. त्या व्यतिरिक्त भारताच्या इतर खेळाडूंना किमान दोन अंकी धावाही करता आल्या नाहीत. चार फलंदाज शून्यावर बाद झाले. त्यामुळे सामन्यातले ८ चेंडू बाकी असताना भारताचा डाव १२५ धावांवर आटोपला.

ऑस्ट्रेलियानं ही धावसंख्या ६ गडी गमावून सामन्यातले ४० चेंडू बाकी असताना पार केली.

अवघ्या १३ धावा देत भारताचे तीन गडी बाद करणारा ऑस्ट्रेलियाचा जॉश हेझलवूड सामनावीर ठरला.

<><><><><>

आदिवासी विद्यार्थ्यांमधले सुप्त क्रीडा गुण विकसित करण्यासाठी ६०० विद्यार्थी क्षमतेची क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यात येईल, अशी माहिती आदिवासी विकास मंत्री डॉक्टर अशोक उईके यांनी दिली आहे. आज त्यांच्या हस्ते नाशिकमध्ये एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन झालं तेव्हा ते बोलत होते.

<><><><><>

जिल्हा व्यवसाय सुधारणेसाठी राज्यातल्या प्रत्येक  जिल्हाधिकाऱ्यांना जादा अधिकार देण्यात येणार असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस केलं आहे.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह इथं आज ‘इज ऑफ डुईंग बिझिनेस’ संदर्भात आढावा बैठक झाली त्यावेळी त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्यानं त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. राऊत यांनी समाज माध्यमावर आपल्या प्रकृतीविषयी माहिती दिली आहे. वैद्यकीय सल्ल्यानुसार आपण काही काळ सार्वजनिक जीवनात सक्रिय राहणार नसल्याचं राऊत यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राऊत यांच्या प्रकृतीविषयी विचारपूस करून त्यांना बरं वाटावं, अशी कामना करत असल्याचं समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय, तर कोकणात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्री आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**